h. Members may refer to the Postal Ballot Notice for detailed instructions on remote e-voting for the special business transacted through Postal Ballot. Please refer the 'e-voting user manual' for Members available in the download section of the e-voting website of NSDL i.e. www.evoting.nsdl.com. In case of any queries/grievances relating to e-voting procedure you may contact Ms. Pallavi Mhatre, Manager, NSDL, 4th Floor, 'A' Wing, Trade World, Kamala Mills Compound, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai- 400 013, email: evoting@nsdl.co.in or call at Tel: 1800 1020 990 and 1800 22 44 30.

Members may also write to the Company Secretary of the Company at the registered office or email at *investorservices@cgglobal.com*.

For **CG Power and Industrial Solutions Limited**

P Varadarajan
Company Secretary
Membership No. ACS 8237

Mumbai, 24th August, 2021

financialexp.epapr.in

जी-७ बैठकीआधी बोरिस जॉन्सन यांची स्पष्टोक्ती

तालिबानचे मूल्यमापन कृतींवरून

वृत्तसंस्था, लंडन



तालिबानच्या वर्तनाचे मूल्यमापन त्यांच्या बोलण्यावरून नव्हे तर कृतींवरून केले जाईल असे ब्रिटनचे पंतप्रधान बोरिस जॉन्सन यांनी जी ७ बैठकीच्या अगोदर केले आहे. अफगाणिस्तानच्या परिस्थितीवर विचार करण्यासाठी ही आभासी बैठक होत आहे.

तालिबानने अफगाणिस्तानातील सत्ता १५ ऑगस्ट रोजी हस्तगत केली असून अध्यक्ष अशरफ घनी यांना देशातून पलायन करावे लागले होते.

दरम्यान, डाउनिंग स्ट्रीटने म्हटले आहे की, जॉन्सन यांनी जी ७ देशांची बैठक बोलावली असून त्यात कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान व अमेरिका यांचा समावेश आहे. या देशांनी अफगाणिस्तानच्या पाठीशी उभे रहावे यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. ब्रिटनने अफगाणिस्तानला आधीच मदत केली आहे तशीच इतर देशांनीही केली आहे, असे सहकार्य पुढेही चालू ठेवण्याची आवश्यकता जॉन्सन यांनी व्यक्त केली आहे. अफगाणिस्तानात मानवी हक्कांचे संरक्षण करून त्या भागात स्थिरता प्रस्थापित करण्याची आवश्यकता आहे. लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याला आपले प्राधान्य राहील, अफगाणिस्तानमधील परिस्थितीबाबत संयुक्त दृष्टिकोन असावा यासाठी जी ७ देशांची परिषद बोलावल्याचे जॉन्सन यांनी म्हटले आहे. अफगाणिस्तानला मदत करण्यासाठी ब्रिटन सदैव तत्पर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



अफगाणिस्तानातून आणखी ७८ जण भारतात

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

भारताने मंगळवारी ७८ लोकांना मायदेशी आणले असून त्यात २५ भारतीय व इतर अफगाणी शीख लोकांचा समावेश आहे. त्यांना दुशान्बे येथून आणण्यात आले. त्यांना काबूल येथून ताजिकिस्तानातील या शहरात आणण्यात आले होते.

गुरु नानक साहिबचे तीन ग्रंथ असलेल्या गटाला दुशान्बे येथून लष्करी विमानाने देशात आणण्यात आले, असे भारतीय हवाई दलाने सोमवारी म्हटले होते. मंगळवारी पुन्हा या मोहिमेत मायदेशी आणण्यात आलेल्या लोकांमुळे १६ ऑगस्टपासून सुटका करण्यात आलेल्या व्यक्तींची संख्या आता आठशेवर गेली आहे.

तालिबानने काबूलवर कब्जा केल्यानंतर १६ ऑगस्टला पहिल्यांदा लोकांच्या पहिल्या गटाची सुटका करण्यात आली होती. आज ज्यांना भारतात आणण्यात आले त्यांचे इंदिरा गांधी विमानतळावर केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी व व्ही मुरलीधन यांनी स्वागत केले. एअर इंडियाच्या विमानाने या लोकांना दुशान्बे येथून आणण्यात आले. या लोकांचे स्वागत करताना आम्हाला आनंद होत आहे. त्यांच्याकडे गुरु ग्रंथसाहिबच्या तीन प्रती होत्या त्याही सुरक्षित आणण्यात आल्या आहेत.

परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची यांनी सांगितले की, ७८ जणांना एअर इंडियाच्या विमानाने भारतात आणण्यात आले. त्यात २५ भारतीय नागरिक आहेत. सोमवारी १४६ जणांना चार विमानांनी भारतात आणण्यात आले होते ते त्यांना आधी कतारची राजधानी दोहा येथे आणण्यात आले होते.

‘अफगाणिस्तानमधील स्थितीस पाकिस्तानच जबाबदार’

वॉशिंग्टन : अफगाणिस्तानातील परिस्थिती पाकिस्तानमुळे बिघडली असून तेथे महिलांचा छळ चालू आहे असे अफगाणी पॉप स्टार आर्याना सईद यांनी म्हटले आहे.



तिने सांगितले की, तालिबान्यांनी देशावर ताबा मिळवताच महिलांचा छळ सुरू केला आहे. महिलांना तेथे राहणे अवघड झाले आहे. तालिबानी लोक महिलांना बुरखा परिधान करण्याची जबरदस्ती करीत आहेत. नागरिकांचाही मोठ्या प्रमाणात छळ सुरू आहे. तालिबान्यांना पाकिस्तानचा पाठिंबा असून त्याचे पुरावे देखील आहेत, असा दावा तिने केला आहे. आर्यानाला तेथून सुटका करून घेण्यात यश आले आहे.

पंजाब काँग्रेसमध्ये मुख्यमंत्र्यांविरोधात बंडाळी

पीटीआय, चंडीगड

पंजाब काँग्रेसमध्ये मुख्यमंत्री अमरिंदरसिंग आणि नवनियुक्त प्रदेशाध्यक्ष नवज्योतसिंग सिद्धू यांच्यातील वर्चस्वाच्या लढाईला उघड तोंड फुटले आहे. अमरिंदर मंत्रिमंडळातील चार मंत्र्यांसह अनेक काँग्रेस आमदारांनी अमरिंदर यांना मुख्यमंत्री पदावरून हटविण्याची मागणी केली आहे.



त्याच वेळी अमरिंदर यांच्या समर्थकांनी सिद्धू यांना लक्ष्य करीत त्यांच्या दोन सल्लागारांवर कथित राष्ट्रविरोधी वक्तव्याप्रकरणी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

काँग्रेसने गेल्या विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता विद्यमान सरकार करू शकले नाही, असा अमरिंदर विरोधकांचा प्रमुख आक्षेप आहे.

अमरिंदर यांच्याविरुद्ध मंगळवारी त्रिप्त राजिंदरसिंग बाजवा, सुखविंदरसिंग सरकारिया, सुखजिंदरसिंग रंधवा आणि चरणजितसिंग चन्नी यांच्यासह डझनभर आमदारांनी बैठक घेतली. बाजवा यांच्या निवासस्थानी ही बैठक झाली. अमरिंदर यांना पदावरून घालवण्याची लोकांची इच्छा आहे, असा दावा त्यांनी केला.

तालिबानच्या प्रशासकीय मंडळात करजाई, अब्दुल्ला, बरादर

वृत्तसंस्था, काबूल

तालिबानने देशातील कारभाराचे नियोजन करण्यासाठी नेमलेल्या बारा सदस्यांच्या मंडळात अफगाणिस्तानचे माजी अध्यक्ष हमीद करजाई, राष्ट्रीय समेट मोहिमेचे प्रमुख अब्दुल्ला अब्दुल्ला तसेच तालिबानचे सहसंस्थापक अब्दुल गनी बरादार यांचा समावेश केला आहे.

या बारा जणांपैकी सात जणांनी आधीच या मंडळात काम करण्याची तयारी दर्शवली आहे असे स्पुटनिक या वृत्तसंस्थेला तालिबानने सांगितले. दरम्यान तालिबानचे सरकार अमेरिकी सैन्य पूर्णपणे माघारी गेल्याशिवाय स्थापन होणार नाही असे आधी सांगण्यात आले होते.

दुसऱ्या एका घडामोडीत संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कविषयक अधिवेशनात भारताचे कायम प्रतिनिधी मणी पांडे यांनी सांगितले की, अफगाणिस्तानातील स्थितीमुळे शेजारी देशांना धोका निर्माण होणार नाही. लष्कर ए तोयबा व जैश ए महंमद यांना अटकाव अपेक्षित आहे.

अमेरिका व मित्र देश त्यांच्या नागरिकांना ३१ ऑगस्टपर्यंत मायदेशी आणू शकण्याचे आश्वासन पूर्ण करू शकतील असे वाटत नसल्याचे जर्मनीचे परराष्ट्र मंत्री हेको मास यांनी म्हटले आहे. ते म्हणाले की, ही मोहीम ३१ ऑगस्टनंतरही लांबण्याची शक्यता आहे. गरज असलेल्यांना मायदेशी आणणे हे अमेरिका व मित्र देशांचे कर्तव्य राहील.

अमेरिकेने तालिबानशी संपर्क करून वाटाघाटी सुरू केल्या आहेत. राजकीय व सुरक्षा मार्गाने सूत्रे हलवण्यात येत आहेत, असे अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जॅक सुलीवान यांनी म्हटले आहे.

पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री शहा महंमद कुरेशी यांनी मंगळवारी सांगितले की, अफगाणिस्तानातील सत्ता तालिबानने काबीज केली असली तरी तेथील परिस्थितीवर सर्वंकष राजकीय तोडगा काढला तर शांतता व स्थिरता नांदू शकेल. या दिशेने होणाऱ्या प्रयत्नांना पाकिस्तानचा पाठिंबा राहील, असे त्यांनी रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लावारोव यांच्याशी दूरध्वनीवर बोलताना सांगितले.

मोदी-पुतिन चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आंतरराष्ट्रीय प्रयत्नांचा एक भाग म्हणून रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्याशी अफगाणिस्तानातील स्थितीवर ४५ मिनिटे सविस्तर चर्चा केली. तालिबानी दहशतवाद्यांना रशियात स्थान दिले जाणार नाही अशी भूमिका पुतिन यांनी आधीच जाहीर केली होती.

युक्रेनच्या विमानाचे अपहरण?

किव : अफगाणिस्तानात अडकून पडलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी गेलेल्या युक्रेनच्या विमानाचे अपहरण झाल्याबाबत उलटसुलट बातम्या येत असून युक्रेन व इराणच्या हवाई वाहतूक प्रमुखांनी विमानाचे अपहरण झाल्याचा इन्कार केला आहे. अफगाणिस्तानात लोकांना आणण्यासाठी गेलेल्या विमानाचे अपहरण झाल्याचे वृत्त फेटाळण्यात आले आहे. युक्रेनचे विमान अफगाणिस्तानात नागरिकांना घेण्यासाठी गेले असता त्याचे अपहरण झाल्याचे युक्रेनचे उप परराष्ट्रमंत्री येवगेनी येनीन यांनी म्हटले होते. अज्ञात व्यक्तींनी विमानाचे अपहरण करून ते इराणकडे वळवल्याचे त्यांनी म्हटले होते.

न्यायालयाबाहेर जाळून घेण्याचा प्रयत्न केलेल्या तरुणीचा मृत्यू

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाच्या प्रवेशद्वाराबाहेर १६ ऑगस्ट रोजी एक तरुणी आणि तिच्या मित्राने कथितरीत्या एकमेकांना जाळून जीवन संपविण्याचा प्रयत्न केला होता. यापैकी तरुणीचा मंगळवारी रुग्णालयात मृत्यू ओढवला आहे. या २४ वर्षीय तरुणीने घोसी येथील खासदार अतुल राय यांच्याविरुद्ध बलात्काराची तक्रार दिली होती. त्यावरून आपला छळ सुरू असल्याचा दावा तिने केला होता.

तिच्यासोबतच्या तरुणाचा शनिवारी उपचारांदरम्यान मृत्यू झाला होता.

ही तरुणी उत्तर प्रदेशाच्या गाझीपूर जिल्ह्यात शिक्षण घेत होती. ती आपल्या २७ वर्षीय मित्रासोबत १६ ऑगस्टला दिल्लीत आली होती. त्या दोघांनी सर्वोच्च न्यायालयाच्या प्रवेशद्वाराजवळ अंगावर रॉकेट ओतून जाळून घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी या घटनेचे फेसबुक लाईव्हवर चित्रीकरण प्रसारित केले होते. या तरुणीवर बसपचे खासदार राय यांनी जून २०१९ मध्ये बलात्कार केल्याची तिची तक्रार होती. त्यावेळी ती त्यांच्या घरी गेली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता, तसेच राय यांना तुरुंगातही जावे लागले होते. त्यानंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी आपल्याला खोट्या प्रकरणात गोवण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार केल्याचा गुन्हा दाखल केला, असे या तरुणीचे म्हणणे होते. आता या प्रकरणात दिल्ली आणि उत्तर प्रदेश पोलिसांनी तपास सुरू केला असला तरी ते ही तरुणी आणि तरुणाचा जाबजबाब मात्र नोंदवू शकले नाहीत.

GLENMARK

ग्लेनमार्क फार्मास्युटिकल लिमिटेड

सीआयएन: एल२४२९९एमएच१९७७पीएलसी०१९९८२
नोंदणीकृत कार्यालय: बी/२, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई- ४०००२६.
कॉर्पोरेट कार्यालय: ग्लेनमार्क हाऊस, बी. डी. सावंत मार्ग, चकाला, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेलगत, अंधेरी (पू.), मुंबई- ४०००९९
टेलि.: +९१-२२-४०१८९९९९ **फॅक्स नं.**: +९१-२२-४०१८९९८६
वेबसाइट: www.glenmarkpharma.com **ईमेल**: comlianceofficer@glenmarkpharma.com

४३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

ही सूचना निगम कामकाज मंत्रालयाद्वारा (''एमसीए'') निर्गमित केलेल्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२०, १७/२०२०, २०/२०२० आणि अन्य लागू परिपत्रके आणि सिक्युरिटीज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ तसेच लागू कायद्यांच्या तरतुदींच्या अनुपालनार्थ प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१. कंपनीची ४३वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') एजीएमच्या सूचनेमध्ये पुढे नमूद करण्यात येणाऱ्या कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता शुक्रवार, २४ सप्टेंबर, २०२१ रोजी दु. ०२.०० वा. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/ अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'')द्वारा घेण्यात येणार आहे.
२. एजीएमची सूचना व वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता वार्षिक अहवाल (i) सर्व भागधारकांना ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत त्यांना ईमेलद्वारा पाठविण्यात येणार आहेत आणि (ii) www.glenmarkpharma.com या कंपनीच्या वेबसाइटवर, स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइटवर म्हणजेच www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर व www.nseindia.com या नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइटवरसुद्धा अपलोड करण्यात येणार आहे.
३. **''ई-वोटिंग''द्वारा मतदान करण्याची प्रक्रिया:**
   ए. भागधारकांना ''ई-वोटिंग'' प्रणालीद्वारा एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर त्यांचे मतदान दूरस्थःरीत्या करण्याची संधी मिळणार आहे.
   बी. डिमटेरिअलाइज्ड व प्रत्यक्ष स्वरूपात भाग असलेल्या भागधारकांद्वारा दूरस्थःरीत्या मतदान करण्याची प्रक्रिया आणि ज्या भागधारकांकरिता ज्यांनी त्यांचे ईमेल नोंदणीकृत केलेले नाहीत अशा भागधारकांकरिता एजीएमच्या सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात येणार आहे. सविस्तर तपशील www.glenmarkpharma.com या कंपनीच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
   सी. जर भागधारकांनी त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाहीत, ''ई-वोटिंग''द्वारा मतदान करण्याकरिता लॉगइन अधिकारपत्रे समाविष्ट ईमेलवर याखाली विनिर्दिष्ट पद्धतीनुसार भागधारकांना ईमेल पत्त्यांची यशस्वी नोंदणी करण्याची उपलब्धता करून देण्यात येईल.
४. **नोंदणी प्रक्रिया / ईमेल पत्त्यांची अपडेटिंग:**
   ए. प्रत्यक्ष स्वरूपात भाग असलेल्या भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी einward.ris@kfintech.com यावर ईमेल पाठवून फोलिओ नं., भागधारकाचे नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन्ड केलेली प्रत (मागील व पुढील बाजू), पॅन व आधार/ युटिलिटी बिल्स (३ महिन्यापेक्षा जुने नसलेले)च्या स्वयं-साक्षांकित प्रत इ. सादर करून स्वाक्षरीकृत विनंतीपत्राची तरतुद करावी.
   बी. डिमटेरिअलाईज्ड भाग असलेल्या भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सद्वारा त्यांच्या संबंधित डिपॉझिटरीजकडे त्यांचे ईमेल पत्ते व मोबाइल नंबर्सची नोंद करावी.
५. **लाभांशाची इलेक्ट्रॉनिक पद्धतीने स्वीकृती होण्याकरिता आदेश नोंदणी प्रक्रिया**
   ए. संचालक मंडळाने २८ मे, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेत, वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता प्रत्येकी रु.१च्या दर्शित मूल्याचे रु.२.५ प्रति समन्याय भागाच्या (म्हणजेच २५०%) एकूण लाभांशाच्या प्रदानास मान्यता दिली आहे.
   बी. लाभांशाचे प्रदान पात्र भागधारकांच्या बँक खात्यात, ज्यांनी अभिलेख तारखेस किंवा तत्पूर्वी वैध व आवश्यक बँक तपशिलाची तरतूद केलेली होती, करण्यात आले होते. लाभांच्या स्वीकृतीस पुढील कोणताही विलंब टाळण्याकरिता भागधारकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी त्यांचा केवायसी व बँक तपशील त्यांच्या डिपॉझिटरीजकडे (जेथे भाग डिमटेरिअलाइज्ड स्वरूपात आहेत) आणि आमचे ''आरटीए''- ''केफिन टेक्नोलॉजिस लिमिटेड'' (युनिटः ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेड) सेलेनिअम टॉवर ''बी'', प्लॉट नं. ३१ व ३२, गाचिबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, तेलंगणा- ५०००३२, टेलि.: (०४०) ६७१६२२२२ / ६७१६१५११; फॅक्सः (०४०) २३००११५३; ईमेलः einward.ris@kfintech.com (जेथे भाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत) येथे अपडेट ठेवावा आणि बँक खात्यात लाभांशाचे प्रदान जमा होण्याकरिता विनंती करावी. बँक तपशिलाच्या नोंदणीकरिता प्रक्रियेची या खाली तरतूद करून देण्यात आली आहे.

प्रत्यक्ष स्वरूपात भाग असलेल्या भागांकरिता
भागधारक जे त्यांच्या बँक खात्यात लाभांशाचे प्रदान थेट जमा होण्याकरिता इच्छुक आहेत ते einward.ris@kfintech.com यावर खालील कागदपत्रे सादर करू शकतील.
i. नाव, पत्ता, फोलिओ नं. व बँक तपशील (बँकेचे नाव, खाते क्र., आयएफएससी कोड) नमूद करून स्वाक्षरीकृत विनंती पत्र
ii. पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित पत
iii. पत्याच्या पुराव्याची स्वयं-साक्षांकित प्रत- आधार / युटिलिटी बिल (३ महिन्यांपेक्षा जुने नसलेले)
iv. कॅन्सल्ड चेक लिफ

डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात भाग असलेल्या भागांकरिता
डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात भाग असलेल्या भागांच्या बाबत, भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सद्वारा संबंधित डिपॉझिटरीजकडे त्यांचा बँक तपशील अपडेट ठेवावा.

मंडळाच्या आदेशाद्वारा
ग्लेनमार्क फार्मास्युटिकल्स लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
हरीश कुबेर
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

स्थळः मुंबई
तारीखः २४ ऑगस्ट, २०२१

PUBLIC NOTICE

This is to inform the public that Anil k Jagga (deceased) and Indra A Jagga registered Shareholders of 100 shares of Pfizer Ltd (registered office at Pfizer Centre Patel Estate Road Jogeshwari west Mumbai 400102) have lost the aforesaid shares under Folio no P8092359 bearing Certificate no 251762 - Distictive no's 2459491 to 2459497 (7shares) and Distinctive no's 3607909 to 3607951 (43 shares). And Certificate no 251763 - Distinctive no's 2459498 to 2459500 (3 shares) and Distinctive no's 4189237 to 4189241 (5 shares) and Distinctive no's 10738307 to 10738348 (42 shares). The public are cautioned against purchasing or dealing in any way with the above share certificates . Any person has any claim in respect of the said certificates should lodge such claim with the company or its registrar and transfer agents Karvy Computershare pvt ltd, Karvy Selenium Tower B, Plot no 31-32, Gachibowli, Financial District, Hyderabad - 500032, within 15 days of publication of this notice. After which no claim will be entertained and the company may proceed to issue duplicate share certificates to the registered shareholders
Place: Mumbai
Date: 25.08.2021

INOX LIVE the MOVIE

आयनॉक्स लिजर लिमिटेड
(CIN : L92199MH1999PLC353754)
नोंदणीकृत कार्यालय : पाचवा मजला, विराज टॉवर्स, अंधेरी उड्डाण पुलाच्या बाजूला, पश्चिम द्रुतगती मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.
टेलिफोन : ०२२-४०६२६९००
वेबसाइट : www.inoxmovies.com । ई-मेल आयडी : contact@inoxmovies.com

व्हिडीओ कॉन्फरन्सिंग/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्सद्वारा घेण्यात येणाऱ्या २२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंबंधित (''एजीएम'') माहिती

याद्वारा सूचना देण्यात येते की, एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता आयनॉक्स लिजर लिमिटेडच्या (''कंपनी'') सदस्यांची २२वी एजीएम व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (''व्हीसी'')/ अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'')द्वारा बुधवार, २२ सप्टेंबर, २०२१ रोजी दु. १२.०० वा. (भाप्रवे) घेण्याचे निर्धारित करण्यात आले आहे.

सद्य चालू असलेली कोव्हिड-१९ महामारी लक्षात घेता, कंपनी व्यवहार मंत्रालयाने (''एमसीए'') तिच्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांकित ०८ एप्रिल, २०२०, १७/२०२० दिनांकित १३ एप्रिल, २०२० व ०२/२०२१ दिनांकित १३ जानेवारी, २०२१ (''एमसीए परिपत्रके'' म्हणून एकत्रितरीत्या संदर्भित) द्वारा यासह वाचलेल्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांकित ०५ मे, २०२० द्वारा आणि सिक्युरिटीज अँण्ड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाद्वारा परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ दिनांकित १२ मे, २०२० व परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ दिनांकित १५ जानेवारी, २०२१ च्या अनुपालनार्थ सामायिक स्थळी सदस्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम''द्वारा एजीएमच्या आयोजनास अनुमती देण्यात आली आहे.

कंपन्या अधिनियम (''अधिनियम'') २०१३च्या तरतुदींच्या अनुपालनार्थ (लागू वेळेनुसार त्याकरिता कोणतेही सांविधिक फेरबदल किंवा पुनर्क्रिया समाविष्ट) ''एमसीए परिपत्रके'', ''सेबी परिपत्रके'' यासह वाचलेल्या, वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, त्याखाली तयार केलेल्या नियमांसह आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेन्ट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (''लिस्टिंग रेग्युलेशन्स''), सुधारित केल्यानुसार, कंपनीची एजीएम ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम''द्वारा बुधवार, २२ सप्टेंबर, २०२१ रोजी दु. १२.०० वा. (भाप्रवे) घेण्याचे निर्धारित करण्यात आले आहे.

''एमसीए परिपत्रके व सेबी परिपत्रके'' या अनुपालनार्थ, एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता वार्षिक अहवाल कंपनीच्या सर्व सदस्यांना, फक्त इलेक्ट्रॉनिक प्रणालीमार्फत पाठविण्यात येणार आहेत, ज्यांचे ई-मेल आयडीज कंपनी/ डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे नोंदवलेले आहेत. २२व्या एजीएमची सूचना आणि वित्तीय वर्ष २०२०-२१ करिता वार्षिक अहवाल ''इन्व्हेस्टर रिलेशन सेक्शन''अंतर्गत www.inoxmovies.com या कंपनीच्या वेबसाइटवरसुद्धा अपलोड करण्यात येणार आहेत तसेच स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइटवर जेथे कंपनीचे भाग सूचिबद्ध आहेत म्हणजेच https://www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवर व https://www.nseindia.com या नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडियाच्या वेबसाइटवर तसेच www.evotingindia.com या सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडच्या (''सीडीएसएल'') वेबसाइटवरसुद्धा अपलोड करण्यात येणार आहेत.

सदस्य केवळ ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम''द्वारा एजीएमला हजर राहू शकतील व सहभागी होऊ शकतील. एजीएममध्ये सहभागी होण्याबाबत सूचना एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम''द्वारा सहभागी होणाऱ्या सदस्यांच्या गणसंख्येचे कायद्याच्या कलम १०३ अंतर्गत पूर्ततेच्या प्रयोजनार्थ परिगणना करण्यात येईल. सदस्यांद्वारा प्रॉक्सीजच्या नेमणुकीबाबत सुविधा एजीएमचे आयोजन ''व्हीसी''/ ''ओएव्हीएम''द्वारा होत असल्यामुळे उपलब्ध असणार नाही.

सूचना व वार्षिक अहवालाची स्वीकृती होण्याच्या दृष्टीने, सदस्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या ई-मेल पत्त्यांची त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट्सकडे, जर त्यांनी याआधी सदर ई-मेल पत्त्यांची नोंदणी केलेली नसल्यास, नोंदणी करावी/ अपडेट ठेवावेत. ज्या सदस्यांकडे प्रत्यक्ष स्वरूपात भाग आहेत त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी einward.ris@kfintech.com यावर ई-मेल पाठवून रजिस्ट्रार अँण्ड शेअर ट्रान्सफर एजन्ट्सकडे (''आरटीए'') त्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत करून घ्यावेत.

इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये एजीएमसाठी सूचना प्राप्त होण्यासाठी आणि इलेक्ट्रॉनिक स्वरूपामध्ये मतदानासाठी ई-मेल आयडीची नोंद तात्पुरती करण्यासाठी प्रक्रिया (ई-मेल आयडीची नोंद जर केली नसल्यास):

ए. प्रत्यक्ष स्वरूपात भागधारणा करणाऱ्या सभासदांसाठी- कृपया आवश्यक तपशील जसे की, फोलिओ क्र. सभासदाचे नाव, भाग प्रमाणपत्राची स्कॅन करण्यात आलेली प्रत (पुढील आणि मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन करण्यात आलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन करण्यात आलेली प्रत) ई-मेलद्वारे कंपनीकडे investors@inoxmovies.com आरटीए: einward.ris@kfintech.com यांच्याकडे पाठवावा.
बी. अप्रत्यक्ष स्वरूपात भागधारणा करणाऱ्या सभासदांसाठी- अप्रत्यक्ष खाते तपशील (सीडीएसएल १६ अंकी लाभार्थी आयडी किंवा एनएसडीएल १६ अंकी डीपीआयडी + सीएलआयडी), नाव, क्लायन्ट मास्टर किंवा एकत्रित खाते निवेदनाची प्रत, कंपनीकडे investors@inoxmovies.com आरटीए: einward.ris@kfintech.com यांच्याकडे पॅन (पॅन कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन करण्यात आलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्व-साक्षांकित स्कॅन करण्यात आलेली प्रत) ई-मेलद्वारे कंपनीकडे investors@inoxmovies.com/ आरटीए: einward.ris@kfintech.com यांच्याकडे पाठवावा.

ई-मतदानाद्वारे मतदान करण्याचे स्वरूप :

कंपनी, एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या सर्व ठरावांच्या संदर्भात सीडीएसएलच्या ई-मतदान प्रणालीद्वारे त्यांच्या सर्व सभासदांना दूरस्थ ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देणार आहे. त्याशिवाय कंपनी एजीएमदरम्यान ई-मतदान यंत्रणेद्वारे मतदानाची सुविधा उपलब्ध करून देणार आहे. ई-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठी लॉग इन अधिकारपत्रे सभासदांच्या नोंदविण्यात आलेल्या ई-मेल आयडीवर पाठविण्यात येतील. ई-मतदानाद्वारे मतदान करण्यासाठी तपशीलवार प्रक्रिया एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आली आहे.

सूचना पाठविण्यात आल्यानंतर कोणीही व्यक्ती ज्यांनी कंपनीचे समभाग अधिग्रहित केले आहेत आणि सभासद झाले आहेत आणि कट-ऑफ दिनांकाच्या अनुसार भागधारणा केली आहे त्यांनी एजीएमच्या सूचनेमध्ये देण्यात आलेल्या ई-मतदान प्रक्रियेचा वापर करावा.

सभासद ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे त्यांचा अधिकार बजावला आहे ते एजीएममध्ये सहभागी होऊ शकतात; परंतु एजीएममध्ये परत मतदान करण्यास पात्र नसतील. व्यक्ती ज्यांची नावे सभासदांच्या नोंद वहीमध्ये किंवा डिपॉझिटरीजद्वारे राखण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या नोंद वहीमध्ये कट-ऑफ दिनांक म्हणजेच, बुधवार, १५ सप्टेंबर २०२१ अनुसार आली आहेत त्यांनाच केवळ दूरस्थ ई-मतदान सुविधेचा तसेच एजीएममध्ये मतदान करण्यासाठी पात्र असतील.

ई-मतदानासंदर्भात जर तुम्हाला कोणत्याही समस्या असल्यास www.evotingindia.com वर उपलब्ध असलेल्या कृपया ई-मतदान पुस्तिका/ फ्रिक्वेन्टली आस्क्ड क्वेश्चन्स (''एफएक्यू'')चा कृपया संदर्भ घ्यावा किंवा helpdesk.evoting@cdslindia.com यांना ई-मेल करावे किंवा निम्नस्वाक्षरीकार यांच्याशी संपर्क साधावा.

सदर सूचना लागू असलेल्या एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनार्थ समभागधारकांच्या माहिती आणि हितासाठी जारी करण्यात आली आहे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
आयनॉक्स लिजर लिमिटेडकरिता
सही/-
पार्थसारथी अय्यंगार
कंपनी सचिव
parthsarathy.iyengar@inoxmovies.com
दूरध्वनी : ०२२-४०६२ ६९००
पत्ता : पाचवा मजला, विराज टॉवर्स, अंधेरी उड्डाण पुलाच्या बाजूला, पश्चिम द्रुतगती मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२१

सीजी पॉवर अँण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेड

CIN No.: L99999MH1937PLC002641
नोंदणीकृत कार्यालय: ६वा मजला, सीजी हाऊस, डॉ. अॅनी बेझंट मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
फोन नं.: ०२२-२४२३ ७७७७, **फॅक्स नं.:** ०२२-२४२३ ७७३३
ईमेल: investorservices@cgglobal.com, **वेबसाइट:** www.cgglobal.com

कंपनीच्या टपाल मतदानासाठी नोटीस

याद्वारे सुचित करण्यात येते की:

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांसह वैधानिक बदल अथवा तदनंतर त्यांची कालबध्द कायदेशीर अंमलबजावणी तसेच सिक्युरिटीज अँण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (नोंदणी दायित्व आणि माहिती प्रकटीकरण) नियम, २०१५ (**''नोंदणी नियमावली''**) अन्वये नियम ४४, जनरल मिटींगबाबत (**''एसएस-२''**) इन्स्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज् ऑफ इंडिया यांनी सचिवांसाठी निर्देशित केलेले मापदंड तसेच कंपनी व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) सवलती आणि स्पष्टीकरणाबाबत ८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल २०२०, १५ जून २०२०, २८ सप्टेंबर २०२०२, ३१ डिसेंबर २०२० आणि २३ जून २०२१ रोजी निर्गमित केलेली सर्वसाधारण परिपत्रके क्रमांक अनुक्रमे १४ /२०२०, १७/२०२०, २२/२०२०, ३३/२०२०, ३९/२०२० आणि १०/२०२१ (**'एमसीए परिपत्रके'**) आणि सिक्युरिटीज अँण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाचे १२ मे २०२० चे परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी१/सीआयआर/पी/२०२०/७९ तसेच १५ जानेवारी २०२१ चे परिपत्रक सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी२/सीआयआर/पी/२०२१/११ (**सेबी परिपत्रके**) या सर्वाच्या एकत्रित वाचनासह कंपनी कायदा, २०१३ (**द अॅक्ट**) मधील कलम ११० त्याचबरोबर जर काही कायदे आणि नियम लागू असल्यास त्यांच्या पुर्ततेनुसार टपाल मतदान नोटीसमध्ये ठराव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. हा विशेष ठराव असून दूरस्थ ई-मतदान प्रक्रियेआधारे (**दूरस्थ ई-मतदान**) टपाल मतदानाच्या माध्यमातून सीजी पॉवर आणि इंडस्ट्रीयल सोल्युशन्स लिमिटेड (**द कंपनी**) च्या सभासदांकडून मंजुरी मिळण्यासाठी सादर करण्यात आलेला आहे.

प्रस्तावित ठरावः

कलम क्रमांक १:

कर्मचारी समभाग पर्याय योजना २०२१ ('ईसॉप २०२१') आणि ईसॉप २०२१ अंतर्गत कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या समभाग पर्यायाला मंजुरी देणे

एमसीए आणि सेबीच्या परिपत्रकानुसार, डिपॉझिटरी पार्टीसिपंटस/ कंपनी / रजिस्ट्रार आणि समभाग हस्तांतर प्रतिनिधी (**''आरटीए''**) म्हणजेच डेटामॅटिक्स बिझनेस सोल्युशन्स लिमिटेड (पुर्वीचे नाव डेटमॅटिक्स फायनान्शल सर्व्हिसेस लिमिटेड) यांच्याकडे ई-मेल पत्त्यांची नोंदणी असलेल्या कंपनी सभासदांना टपाल मतदानाची नोटीस ही इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविण्यात आलेली आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमातून नोटीस वितरणाचे काम २४ ऑगस्ट. २०२१ ला पुर्ण झालेले आहे. दूरस्थ ई-मतदानाची प्रक्रिया आणि पध्दत स्पष्ट करणारी टपाल मतदानाची नोटीस कंपनीच्या www.cgglobal.com या संकेतस्थळावर तसेच शेअर बाजाराच्या म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे संकेतस्थळ आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (**''एनएसडीएल''**) चे संकेतस्थळ www.evoting.nsdl.com यावर देखील उपलब्ध आहे.

कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० (**''नियमावली''**) ज्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा, तसेच इन्स्टीट्युट ऑफ कंपनी सेक्रेटरीज् ऑफ इंडिया निर्देशित केलेली नोंदणी नियमावली आणि सचिवांसाठी निर्देशित केलेले एसएस-२ अंतर्गत नियम ४४ यांच्या वाचनासह कंपनी कायद्यातील कलम १०८ च्या तरतुदीला अनुसरुन प्रस्तावित करण्यात आलेल्या कामकाजासंदर्भात सभासदांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता येण्यासाठी एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com या संकेतस्थळाच्या माध्यमातून इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधा प्रदान करताना अतिशय आनंद होत आहे.

विविध नियम, एसएस-२ आणि एमसीए परिपत्रकाच्या वाचनासह कायद्यातील तरतुदींना अनुसरुन त्याबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणेः

ए) निर्धारित अंतिम मुदतीपर्यंत म्हणजेच **शुक्रवार, २० ऑगस्ट, २०२१ या कट-ऑफ डेटपर्यंत** भौतिक स्वरुपात अथवा डिमटेरियलाईज्ड स्वरुपात समभाग धारण करणारे सभासदच ई-मतदानाच्या माध्यमातून मतदानाचा हक्क बजावण्यास पात्र राहणार आहेत. जे सभासद निर्धारित अंतिम मुदतीपर्यंत सभासद झालेले नाहीत, अशा व्यक्तींनी टपाल मतदानाबाबतची नोटीस ही फक्त त्यांच्या माहितीसाठी असल्याचे गृहीत धरावे.

बी) **ई-मेल पत्त्यांची नोंदणी/अद्ययावतीकरण करण्याची पध्दतः**

i) भौतिक स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या सभासदांनी आपली विनंती ई-मेलच्या माध्यमातून आरटीए यांना cginvestors@datamaticsbpm.com या ई-मेलवर पाठवावी. त्यात त्यांनी आपला फोलिओ क्रमांक, सभासदाचे नाव, समभाग प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत (पुढील आणि मागील बाजू), पॅन (पॅन कार्डची स्वसांक्षाकित केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्वसांक्षाकित केलेली प्रत) या माहितीचा समावेश करावा.

ii) समभाग जर डिमॅट स्वरुपात धारण केलेले असतील, तर कृपया सभासदांनी डीपीआयडी-सीएलआयडी किंवा लाभधारकासाठीचा आयडी (१६ अंकी डीपीआयडी + सीएलआयडी अथवा लाभधारकांसाठीचा १६ अंकी आयडी) , नाव, सभासद मस्टर अथवा आपल्या डिमॅट खात्यातील एकत्रित व्यवहारांच्या माहितीची प्रत, पॅन (पॅन कार्डची स्वसांक्षाकित केलेली प्रत), आधार (आधार कार्डची स्वसांक्षाकित केलेली प्रत) ही माहिती investorservices@cgglobal.com या ई-मेलवर पाठवावी. जर तुम्ही डिमॅट स्वरुपात समभाग धारण करणारे वैयक्तिक भागधारक असाल, तर नोटीसमध्ये स्टेप १ (ए) मध्ये स्पष्ट करण्यात आलेल्या लॉगिन पध्दतीचा म्हणजेच डिमॅट स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या वैयक्तिक समभागधारकांकरिता ई-मतदानासाठी लॉगिन पध्दत तसेच दूरस्थ मिटींगमध्ये सहभाग हा संदर्भ विचारात घेण्याची विनंती करण्यात येत आहे.

iii) ई-मतदानासाठी आयडी आणि पासवर्ड प्राप्त करण्यासाठी समभागधारक/सभासद वर उल्लेख केलेल्या कागदपत्रांसह आपली विनंती वैकल्पिकरित्या evoting@nsdl.co.in या ईमेलवरही पाठवू शकतात.

iv) नोंदणीकृत कंपन्याकडून ई-मतदान सुविधेबाबत सेबीच्या ९ डिसेंबर २०२० च्या परिपत्रकानुसार, डिमॅट स्वरुपात समभाग धारण करणाऱ्या वैयक्तिक समभागधारकांना डिपॉझिटरीज आणि डिपॉझिटरी पार्टीसिपंटसकडे असलेल्या डिमॅट खात्याच्या माध्यमातुनसुध्दा मतदान करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. ई-मतदानाच्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी समभागधारकांनी डीमॅट खात्यातील नोंदीत त्यांचा मोबाईल क्रमांक आणि ईमेल आयडी योग्यरित्या अद्ययावत करणे आवश्यक आहे.

सी) **ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान करण्याची पध्दतः**

टपाल मतदानाच्या नोटिसमध्ये नमूद केलेल्या कामकाजावर दूरस्थपणे मतदान करण्याची संधी सभासदांना ई-मतदान प्रणालीद्वारे मिळेल. वर उल्लेख केलेल्या प्रक्रियेनुसार आपल्या ई-मेल पत्यांची नोंदणी यशस्वीरित्या पुर्ण केलेल्या सभासदांना ई-मतदानाच्या माध्यमातून मतदान करण्यासाठीचे लॉगीन ओळखपत्रे त्यांच्या ई-मेलच्या माध्यमातून उपलब्ध राहणार आहे. ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची तपशीलवार प्रक्रिया टपाल मतदानाच्या नोटिसमध्ये देण्यात आलेली आहे, तसेच कंपनीच्या संकेतस्थळावरही सविस्तर तपशील उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

डी) दूरस्थ ई-मतदानाची प्रक्रिया **बुधवार, २५ ऑगस्ट, २०२१ या दिवशी सकाळी नऊ वाजता (भाप्रवे) सुरु होऊन गुरुवार, २३ सप्टेंबर, २०२१ ला सायंकाळी पाच वाजता (भाप्रवे)** संपणार आहे. या निर्धारित वेळेनंतर ई-मतदानाची प्रक्रिया एनएसडीएलकडून खंडीत केली जाणार असून त्यानंतर मतदानास परवानगी दिली जाणार नाही.

ई) ठरावावर एकदा मतदान केल्यानंतर सभासदांना त्यात कोणताही बदल करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

एफ) निर्धारित तारखेपर्यंत कंपनीचे सभासद असलेल्यांना (कंपनी/आरटीए /डिपॉझिटरी यांच्याकडे आपल्या ई-मेल पत्यांची नोंदणी न केल्यामुळे नोटीस न मिळालेल्या सभासदांसह) टपाल मतदानाच्या नोटीसमध्ये उल्लेख करण्यात आलेल्या प्रक्रियेनुसार प्रस्तावित कामकाजावर मतदान करण्याचा हक्क असेल.

जी) टपाल मतदान प्रक्रियेतील ई-मतदानाद्वारे प्राप्त झालेल्या मतांची निष्पक्ष आणि पारदर्शक पध्दतीने छाननी करण्यासाठी श्री. प्रशांत एस. मेहता (सभासद क्रमांक एसीएस ५८१४), मेसर्स पी. मेहता अँण्ड असोसिएटसचे भागीदार हे कार्यरत कंपनी सचिव (सीपी क्रमांक. १७३४१) यांना छाननी प्रतिनिधी म्हणुन नियुक्त करण्यात आलेले आहे.

एच) टपाल मतदानाच्या माध्यमातून विशेष कामकाजावर दूरस्थ ई-मतदान करण्याबाबतच्या सविस्तर सुचनांसाठी सभासद टपाल मतदान नोटीसचा संदर्भ घेऊ शकतात. एनएसडीएलच्या संकेतस्थळावर म्हणजेच www.evoting.nsdl.com या संकेतस्थळावर डाऊनलोड विभागात उपलब्ध असलेल्या 'ई-व्होटींग युझर मॅन्युअल' या माहितीपुस्तिकेचा कृपया संदर्भ घ्यावा. ई-मतदानाच्या पक्रियेसंदर्भात अन्य काही प्रश्न अथवा समस्यांच्या निराकरणाबाबत तुम्ही श्रीमती पल्लवी म्हात्रे, व्यवस्थापक, एनएसडीएल, चौथा मजला, ए विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेळ, मुंबई-४०० ०१३ , ईमेल evoting@nsdl.co.in या पत्यावर संपक साधू शकतात अथवा दूरध्वनी क्रमांकः १८०० १०२० ९९० अथवा १८०० २२ ४४ ३० यावरही संपर्क साधू शकतात.

सभासद कंपनी सचिवांना नोंदणीकृत पत्यावर अथवा *investorservices@cgglobal.com* या ई-मेलवर संपर्क साधू शकतात.

सीजी पॉवर अँण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेडसाठी

पी वरदराजन
कंपनी सचिव
सभासद क्रमांक एसीएस ८२३७

मुंबई, २४ ऑगस्ट, २०२१